जा.क्र./लामनपा/सा.बां./ 4100/२०२५
लातूर शहर महानगरपालिका, लातूर.
दि. 16 /०५/२०२५

दरपत्रक (Quotation) सुचना क्र. ५ /२०२५-२६

लातूर शहर म.न.पा. हद्दीमध्ये मागील अनेक वर्षापासून Airtel. Reliance Gio, TataCommunication व अन्य इतर कंपन्यामार्फत Tower to Tower connectivity करीता OFC (Optical Fiber Cabel) टाकण्यात आलेले आहेत. सदर कंपन्यांनी अंथरलेल्या OFC केबलची लांबी करारनाम्यातील मंजूरीपेक्षा अधिकची असल्याची बाब निदर्शनास आली आहे. तसेच करारनाम्यानुसार सदर कंपन्यांना ज्या उद्देशाकरीता OFC अंथरण्याबाबत परवानगी दिली होती याबाबतही उल्लंघन झाल्याची बाब निदर्शनास आली आहे.

लातूर शहर महानगरपालिकेमार्फत या क्षेत्रातील अनुभवी एजन्सीकडून शहरामध्ये अंथरलेल्या OFC (Underground, Overhead) केबलचे प्रत्यक्ष मोजमाप करुन घेण्याचे प्रयोजित आहे. तसेच अंथरलेल्या OFC (Underground, Overhead) केबलचा वापर कोणत्या प्रयोजनासाठी करण्यात आलेला आहे याबाबतही सर्वेक्षण करुन घेण्याचे काम प्रयोजित आहे.

सबब लातूर शहर महानगरपालिकेमार्फत वरील सर्वेक्षणाचे कामासाठी या क्षेत्रातील अनुभवी एजन्सीकडून स्वखर्चाने सर्वेक्षणाचे काम करुन घेण्याकरीता दरपत्रक मागविण्यात येत आहेत. महानगरपालिकेने मंजूर केलेल्या लांबीपेक्षा शहरामध्ये OFC (Underground, Overhead) केबल ची लांबी जास्तीची असल्याबाबत निदर्शनास आणून दिल्यास त्याचप्रमाणे अंथरलेल्या OFC (Underground, Overhead) केबलचा वापराबाबत मंजूरीनुसार तफावत असल्याची बाब निदर्शनास आणून दिल्यास सदर एजन्सीकडून दंडात्मक कार्यवाही करुन वसुल झालेल्या रकमेतून सर्वेक्षणाच्या कामापोटी कांही प्रमाणात रक्कमेचा परतावा करण्याबाबत प्रस्तावित आहे.

सदरच्या कामासाठी तफावतीतील सर्वेक्षणातून जी रक्कम वसूल होईल त्यामधील टक्केवारीच्या हीश्यानुसार दर मागविण्यात येत आहेत.

कोणतेही कारण न देता कोणतेही अथवा सर्व कोटेशन नाकारण्याचा अधिकार लातूर शहर महानगरपालिकेने राखून ठेवलेला आहे.

**कोटेशन दि. २१/०५/२०२५ पर्यंत सादर करावेत.**

sd/-
- आयुक्त,
लातूर शहर महानगरपालिका, लातूर.